# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 29 August 2025**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २९ ऑगस्ट २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- मराठवाड्यात पावसाचा जोर कायम–अनेक ठिकाणी पूरस्थिती–मुख्यमंत्र्यांचं स्थितीवर लक्ष
- जालना जिल्ह्यात भरधाव कार रस्त्यालगतच्या विहिरीत पडून पाच जणांचा मृत्यू
- राज्य सरकारचे विविध क्षेत्रासाठी ३४ हजार कोटी रुपयांहून अधिकचे सामंजस्य करार

आणि

- क्रीडा क्षेत्रात पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी पाठपुरावा करणार– केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांचं आश्वासन

****

मराठवाड्यात आजही पावसाचा जोर कायम असून, अनेक ठिकाणी पूरपरिस्थती उद्भवली आहे. नांदेड जिल्ह्यात ६९ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. विष्णूपुरी प्रकल्पाचे ११ दरवाजे उघडण्यात आले असून, एक लाख २९ हजार ७४३ घनफूट प्रतिसेकंद वेगानं गोदावरी पात्रात विसर्ग सुरू आहे.

नांदेड जिल्ह्यात उमरी रेल्वे स्टेशनचे अधीक्षक ओमप्रकाश मीना यांचा पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानं मृत्यू झाला. उमरी रेल्वे स्थानकावरून ते कर्तव्यावरून घरी परत येत असताना बोळसा बुद्रुक इथल्या रेल्वेच्या पुलावरुन पाय घसरुन ते पाण्यात बुडाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, नांदेड जिल्ह्यातील परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. जिल्हा प्रशासन संपूर्ण परिस्थिती योग्यरित्या हाताळत असल्याचं, मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले...

## बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दरम्यान, जिल्ह्यात उद्भवलेली पूर परिस्थिती लक्षात घेता पालकमंत्री अतुल सावे हे तातडीने नांदेडकडे रवाना झाले आहेत.

✻✻

लातूर जिल्ह्यात मांजरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने, धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मांजरा आणि तिच्या उपनद्यांच्या काठावर राहणाऱ्या सर्वांना सतर्क राहण्याचं आणि विशेष खबरदारी घेण्याचं आवाहन लातूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं केलं आहे.

✻✻

हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत, औंढा, कळमनुरी तालुक्यात रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू आहे. कळमनुरी तालुक्यातल्या जवळा पांचाळ परिसरात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला असून, अनेक वसाहतींमध्ये पाणी शिरलं आहे. जिल्ह्यातील सिद्धेश्वर धरणाचे १४, तर इसापूर धरणाचे ७ दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे पूर्णा आणि पैनगंगा या दोन्ही नद्यांना पूर आला आहे.

धाराशिव शहर आणि परिसरातही आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे.

✻✻

बीड जिल्ह्यातल्या १६ महसुली मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झाली. जिल्ह्यात सलग दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे नदी, नाले, ओढे भरून वाहत आहेत, तर अनेक ठिकाणी शेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

परभणी जिल्ह्यात दोन दिवसापासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. गंगाखेड तालुक्यातील मासोळी प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरत असल्याने कोणत्याही क्षणी कालव्यातून पाणी सोडण्यात येईल, त्यामुळे परिसरातील नागरिकांनी सतर्क राहण्याचं आवाहन उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांनी केलं आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात चार मंडळात अतिवृष्टी झाल्याचं वृत्त आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यंत्रणेला सतर्क राहण्याचे तसंच प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

✻✻

दरम्यान, राज्यात कोकण तसंच मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर उद्या यलो अलर्ट देण्यात आला आहे. उर्वरित राज्यात पुणे सातारा तसंच कोल्हापूरचा काही भाग वगळता आज यलो अलर्ट देण्यात आला आहे.

****

जालना जिल्ह्यात एक भरधाव कार रस्त्यालगतच्या विहिरीत पडून पाच जणांचा मृत्यू झाला. राजुर-टेंभुर्णी मार्गावर गाडेगव्हाण फाटा इथं आज पहाटे ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त कारच्या धडकेत रस्त्यावरून पायी चालणारे देळेगव्हाण इथले एक नागरिक गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जालना इथल्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, सात तासांच्या प्रयत्नानंतर अपघातग्रस्त कार आणि मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आलं आहे. या घटनेची टेंभुर्णी पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

****

उपराष्ट्रपती पदाचे विरोधी पक्षाचे उमेदवार माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी आज मुंबई दौऱ्यावर आले आहेत. आपण कुठल्याही राजकीय पक्षाचे सदस्य नाही आणि होण्याचा विचार नाही. त्यामुळे देशातल्या सर्व खासदारांना पत्र लिहून पाठिंबा मागणार असल्याची भूमिका, रेड्डी यांनी स्पष्ट केली. दरम्यान रेड्डी यांनी आज मुंबईत ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली.

****

गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात सहज आणि सुरळीत अनुभव मिळावा यासाठी सरकार वचनबद्ध आहे. गुंतवणुकीच्या प्रत्येक टप्प्यावर राज्य शासन भागीदार म्हणून सोबत राहील असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. मुख्यमंत्र्यांनी आज विविध १७ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या कराराबाबत मुख्यमंत्र्यांनी अधिक माहिती दिली...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मनोज जरांगे पाटील मुंबईत आंदोलनासाठी आल्यानंतर विरोधकांची भाषा बदलली आहे, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. या आंदोलनावरून विरोधकांनी सोयीची भूमिका न घेता, आपली भूमिका स्पष्ट करावी, असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. सकाळपासून यासंदर्भातील विरोधकांची विधाने मी ऐकली आहेत. मात्र विरोधकांना

यातून राजकीय पोळी भाजायची असल्याची टीका मुख्यमंत्र्यांनी केली. आंदोलकांनीही नागरिकांना त्रास होऊ नये, याची खबरदारी घेण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. राज्याची सामाजिक वीण सुरक्षित राखण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

****

दरम्यान, मनोज जरांगे पाटील आपल्या समर्थकांसह मुंबईत आझाद मैदानात दाखल झाले असून, त्यांच्या उपोषणाला सुरुवात झाली आहे. आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

****

राष्ट्रीय क्रीडा दिन आज साजरा होत आहे. महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. शांतीपूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाला प्रोत्साहन देण्यासाठी खेळ, ही यंदाची या दिवसाची संकल्पना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या

****

क्रीडा क्षेत्रासाठी पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करत असून, यामध्ये उद्योग क्षेत्राला सहभागी करून घेण्याची गरज केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केली आहे. आज छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया–साईच्या परिसरात झालेल्या सत्कार सोहळ्यात क्रीडापटूंना मार्गदर्शन करत होत्या. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र कायम चमकदार कागिरी करत असल्याबद्दल त्यांनी क्रीडापटूंचं कौतुक केलं. त्या म्हणाल्या...

**बाईट – केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे**

माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड तसेच साईच्या संचालक मोनिका घुगे यांची विशेष उपस्थिती होती. साई औरंगाबादचं यावेळी साई छत्रपती संभाजीनगर असं नामकरण झाल्याचं, यावेळी खडसे यांनी जाहीर केलं. विविध प्रकारच्या क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करणाऱ्या क्रीडापटूंना रक्षा खडसे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुचनेनुसार देशभरात सर्व खासदारांच्या मतदारसंघात खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती रक्षा खडसे यांनी पत्रकार परिषदेत दिली

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दररोज एक तास खेळासाठी हा उपक्रम सुरु केला जाणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केली. विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या कार्यक्रमात ते आज बोलत होते. यावेळी विविध खेळात प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा सत्कार तसंच क्रीडा शिक्षक, मुख्याध्यापक प्राचार्य यांना प्रोत्साहनपर अनुदान धनादेश वितरित करण्यात आले.

****

बिहारमधल्या राजगीर इथं आजपासून आशिया चषक हॉकी स्पर्धा सुरु होत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होईल. भारतासह सात देश या स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

****

अंबाजोगाईच्या यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा यंदाचा भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार, छत्रपती संभाजीनगर इथले ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांना जाहीर झाला आहे. समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी ही माहिती दिली. स्मृतिचिन्ह, शाल, सन्मानपत्र, पुष्पहार आणि पंचवीस हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या १९ सप्टेंबरला अंबाजोगाई इथं हा पुरस्कार मुलाटे यांना समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात आधुनिक शस्त्रक्रियागृह उभारण्यासाठी शासनाने २ कोटी ८७ लाख २० हजारांच्या निधीला मंजुरी दिली आहे. हा निधी केंद्र आणि राज्य सरकारच्या भागीदारीतून वितरित करण्यात येणार आहे

****